नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 17/03/2023 (शुक्रवार) दुपार

---

## नवजात अर्भकाला बेवारस सोडून देणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद

पो.स्टे. खापा :— अंतर्गत मौजा कोदाडोंगरी शिवार येथे दिनांक १६/०३/२०२३ चे ०५.०० वा. ते ०९.०० वा. चे दरम्यान फिर्यादी नामे— सुरज सूर्यभान जनेकर, वय २४ रा. वाकी हे दिनांक १६/०३/२०२३ रोजी सकाळी १०.०० वा. कोदाडोंगरी शिवारात चाय नास्ता सेंटर वा झाड झुड करून मंदीरात पुजा पाठ करून वाघोबा मंदीरात पुजापाठ करण्याकरीता जात असतांना फिर्यादीला लहान बाळाचे रडण्याचा आवाज आल्याने एका पोत्यावर असलेल्या निळया रंगाचे चादरीवर एक नवजात पूरात जातीचे अर्भक बेवारस स्थितीत दिसून आले तेव्हा फिर्यादीने त्याचे कोणी नातेवाईक असावा आई वडील आहेत काय याबाबत शोध घेतला परंतु कोणीही दिसून आले नाही तेव्हा दहेगाव (रंगारी) येथील किशोर चौधरी हे आले व त्यांनी त्या अनोळखी नवजात बाळाला स्वत:चे कारमध्ये टाकून उपचार करीता पाटनसावंगी येथे आणले या दरम्यान खापा पोलीसाला सुध्दा माहीती देण्यात आली मौजा कोदाडोंगरी परीसरातील गंगाजी महाराज चे मंदीर जवळील कडुलींबाचे झाडाचे जवळ दि. १६/०३/२०२३ रोजी चे सकाळी ०५.००वा. ते ०९.०० वा सूमारास कोणीतरी अज्ञात ईसमानी सदरचे नवजात बाळ (अर्भक) बेवारस स्थितीत सोडले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. खापा येथे आरोपीविरुध्द कलम ३१७ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास ग्रे.पोउनि विजय बाराई हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर